# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date: 18 October 2024

Time: 7.10 to 7.20 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक: १८ ऑक्टोबर २०२४ सकाळी ७.१० मि.**

****

***ठळक बातम्या***

- **विधानसभा निवडणुकीसाठी मतदार यादीत नाव समाविष्ट करण्यासाठी दोन दिवसांची मुदत**
- **राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या मुख्यमंत्र्यांची पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखाली बैठक, महाविकास आघाडी रविवारी जागावाटप जाहीर करणार**
- **नांदेड लोकसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीसाठी काँग्रेसकडून रविंद्र चव्हाण यांना उमेदवारी**
- **तुळजापूर विधानसभा मतदारसंघात ४० बोगस मतदारांवर प्रशासनाची कारवाई**

**आणि**

- **बंगळुरु कसोटीत दुसऱ्या दिवसअखेर न्यूझीलंडकडे १३४ धावांची आघाडी**

***सविस्तर बातम्या***

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नागरिकांना मतदार यादीत नाव समाविष्ट करण्यासाठी अखेरचे दोन दिवस शिल्लक आहेत. उद्या १९ ऑक्टोबरच्या रात्रीपर्यंत ऑनलाईन किंवा ऑफलाईन पद्धतीने मतदार यादीत नाव नोंदणी करण्याची संधी असून, निरंतर मतदार नोंदणीचा कार्यक्रम अद्याप सुरु आहे. सर्व मतदारांनी आपलं नाव मतदार यादीत असल्याची खात्री करून घ्यावी. ज्यांनी अजून मतदार म्हणून नाव नोंदणी केलेली नाही, त्यांनी उद्यापर्यंतच्या मुदतीत नाव नोंदणी करून घेण्याचं आवाहन, मुख्य निवडणूक अधिकारी तथा प्रधान सचिव एस.चोक्कलिंगम यांनी केलं आहे.

***मतदानाच्या दिवशी आपले नाव मतदार यादीमध्ये आहे का, असं काही मतदार शोधतात, आणि त्यांचं नाव नसेल तर त्यावेळेला अडचण येते. आपण सर्वांनी कृपया आपले नाव मतदार यादीत आहे का, हे तपासावे. आणि नसेल तर १९ ऑक्टोबर २०२४च्या रात्रीपर्यंत ऑनलाईन किंवा ऑफलाईन अर्ज करावे, जेणेकरुन आपल्याला या वेळी मतदान करता येईल. आपल्या सर्वांना विनंती आहे की वेळेवर अर्ज करावे, आणि यावेळच्या निवडणुकीमध्ये भाग घ्यावा.***

****

मराठवाडा, विदर्भ आणि उत्तर महाराष्ट्रातल्या नागरिकांनी विधानसभा निवडणुकीदरम्यान काळ्या पैशाचा वापर रोखण्यासाठी प्राप्तिकर विभागास सहकार्य करावं, असं आवाहन, आयकर उपसंचालक अनिल खडसे यांनी केलं आहे. काळा पैसा वापरला जात असल्याची, रोख रकमेचं वाटप होत असल्याची किंवा रोख रकमेची हालचाल होत असल्याबाबत विश्वसनीय माहिती मिळाल्यास, १८-००-२३३-०३५५ या टोल फ्री क्रमांकावर अथवा, ९४ ० ३३ ९० ९८ ० या क्रमांकावर व्हॉट्सॲप संदेश पाठवावा असं आवाहन खडसे यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे केलं आहे.

****

राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांची बैठक काल चंडीगढ इथं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झाली. सुशासन आणि नागरीकांचं जीनवमान उंचावण्यासंदर्भात या बैठकीत व्यापक चर्चा झाल्याचं पंतप्रधानांनी सामाजिक माध्यमावरच्या संदेशात सांगितलं. या बैठकीला भाजप अध्यक्ष जे. पी. नड्डा, संरक्षण मंत्री राजनाथ सिंग, गृहमंत्री अमित शहा उपस्थित होते. सध्या १३ मुख्यमंत्री आणि १६ उपमुख्यमंत्री भाजपाचे असून महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, बिहार, सिक्कीम, नागालँड आणि मेघालयचे मुख्यमंत्री हे भाजपाच्या मित्रपक्षांचे आहेत. संविधानाचा अमृत महोत्सव साजरा करण्यासंदर्भातही या बैठकीत चर्चा झाली.

****

महाविकास आघाडीच्या जागावाटपाबाबत आतापर्यंत २१६ जागांवर सहमती झाली असल्याचं, विधानसभेतले विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी सांगितलं. ते काल मुंबईत वार्ताहर परिषदेत बोलत होते. काँग्रेसच्या ८४ जागांवरच्या उमेदवारांची छाननी झाली असून, रविवारी या ८४ किंवा काँग्रेसच्या सर्व जागांवरचे उमेदवार जाहीर होण्याची शक्यता त्यांनी वर्तवली. समाजवादी पक्षाला महाविकास आघाडी काही जागा देणार वडेट्टीवार यांनी सांगितलं.

****

नांदेड लोकसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीसाठी काँग्रेसने रवींद्र चव्हाण यांना उमेदवारी जाहीर केली आहे. पक्षाचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी काल एका पत्रकाद्वारे ही घोषणा केली. रवींद्र चव्हाण हे दिवंगत खासदार वसंतराव चव्हाण यांचे पुत्र आहेत. वसंतराव चव्हाण यांच्या निधनामुळे इथं विधानसभा निवडणुकीसोबतच लोकसभेची पोटनिवडणूक होत आहे.

****

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर परिवर्तन महाशक्ती आघाडी तिसऱ्या आघाडीची काल पुण्यात बैठक झाली. या बैठकीत विधानसभेच्या १५० जागा लढवण्यावर एकमत झाल्याचं स्वाभिमानी शेतकरी पक्षाचे आमदार राजू शेट्टी यांनी बैठकीनंतर पत्रकारांशी बोलतांना सांगितलं.

****

छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी काल कन्नड विधानसभा मतदार संघाचा आढावा घेतला. स्ट्राँगरुम पाहणी, निवडणूक विषयक कामकाजासंदर्भात प्रशासनाने केलेल्या सर्व पूर्वतयारीचं त्यांनी अवलोकन केलं. सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना आपण करत असलेल्या कामाबाबत पूर्ण माहिती असायला हवी, तसंच मतदान केंद्र, मतदान यंत्रे, त्याची प्रक्रिया, तसंच मतदारांना द्यावयाच्या सुविधांच्या पूर्ततेबाबत प्रत्येक केंद्राधिकाऱ्याने वेळोवेळी आढावा घेण्याची सूचना स्वामी यांनी केली.

****

धाराशिव जिल्ह्यातल्या तुळजापूर विधानसभा मतदारसंघात ४० बोगस मतदार आढळले असून, त्यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. निवडणूक आयोगाच्या मतदार नोंदणी कार्यक्रमाअंतर्गत नोंदणी करतांना, हे बोगस मतदार निदर्शनास आले.

दरम्यान, या मतदारसंघातल्या प्रत्येक गावात परवा २० ऑक्टोबर रोजी मतदार यादी चावडी वाचन होणार असून, यासाठी गावातल्या सर्व नागरिकांनी उपस्थित राहून, मतदार नोंदणी संदर्भात काही आक्षेप असल्यास नोंदवावेत असं आवाहन जिल्हाधिकारी डॉक्टर सचिन ओंबासे यांनी केलं आहे.

****

नाशिक जिल्ह्यातल्या चांदवड-देवळा विधानसभा मतदार संघातले भाजपाचे आमदार डॉ. राहुल आहेर यांनी यंदाची विधानसभा निवडणूक न लढवण्याची घोषणा केली आहे. या मतदार संघातून उमेदवारीसाठी आपले चुलतबंधू आणि भाजपचे माजी जिल्हाध्यक्ष केदा आहेर यांच्या नावाची शिफारस पक्षाकडे केल्याचं, त्यांनी काल पत्रकार परिषदेत सांगितलं.

****

विधानसभा मतदारसंघांचा आढावा घेणारा 'आढावा विधानसभा मतदारसंघांचा' हा कार्यक्रम आकाशवाणीवर सुरू झाला आहे. दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी प्रसारित होणारा हा कार्यक्रम आमच्या ***Youtube*** चॅनलवरुनही आपण ऐकू शकाल. आज या कार्यक्रमात नंदुरबार आणि धुळे जिल्ह्यातल्या मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

****

रेल्वेनं प्रवासाच्या आरक्षणाची आगाऊ कालमर्यादा निम्म्यावर आणली आहे. आता प्रवाशांना प्रवासाच्या ६० दिवसांआधी आरक्षण करता येणार आहे. येत्या एक नोव्हेंबरपासून याची अंमलबजावणी सुरू होणार असल्याचं रेल्वे मंडळानं पत्रकाद्वारे कळवलं आहे. सध्या प्रवासाच्या १२० दिवस म्हणजे सुमारे चार महिने आधीच आरक्षण करता येतं, या निर्णयाचा सध्या तिकिट आरक्षित केलेल्या नागरिकांच्या प्रवासावर काहीही परिणाम होणार नाही. परदेशी प्रवाशांसाठी आरक्षणाची ही कालमर्यादा पूर्वीप्रमाणे ३६५ दिवस असेल.

****

राष्ट्रीय चाचणी संस्था-एनटीएनं गेल्या जून महिन्यात घेतलेल्या यूजीसी नेट २०२४ परीक्षेचा निकाल आज जाहीर होणार आहे. संस्थेनं समाजमाध्यमावरच्या संदेशात ही माहिती दिली.

****

विधानसभा निवडणुकीसाठी नामनिर्देशन पत्र दाखल करताना, उमेदवारांच्या वाहनांच्या ताफ्यात तीनपेक्षा जास्त मोटारगाड्यांचा समावेश नसावा, निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयाच्या १०० मीटर परिसरात तसंच दालनात कमाल पाच व्यक्तींव्यतिरिक्त कोणालाही प्रवेश दिला जाणार नाही. या कार्यालयाच्या परिसरात मिरवणूक काढणं, सभा घेणं, घोषणाबाजी, वाद्य वाजवणं, गाणी म्हणणं आणि कोणत्याही प्रकारचा प्रचार करण्यास प्रतिबंध जारी करण्यात आला आहे.
निवडणुकीसंबंधी भित्तीपत्रकं तसंच कमानी उभारणं, शासकीय तसंच निमशासकीय कार्यालयांच्या परिसरात विविध प्रकारांनी आंदोलन करणं, वाहनांवर ध्वनिक्षेपकांचा वापर, परवानाधारक शस्त्रं बाळगणं, आदी वर निर्बंधाची सूचना, बीड, लातूर, नांदेड, परभणी या जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयानं जारी केली आहे.

****

विधानसभा निवडणुकीचे उमेदवार आणि त्यांच्या राजकीय पक्षांना सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार गुन्हेगारी पार्श्वभूमी प्रसिद्धी करावी लागणार आहे. भारत निवडणूक आयोगाने याबाबत सविस्तर निर्देश आणि प्रलंबित गुन्हेगारी खटल्यांची माहिती प्रसिद्ध करण्यासाठी विहीत नमुने देखील दिले आहेत. उमेदवाराविरुद्ध प्रलंबित गुन्हेगारी खटल्यांची माहिती निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळावर, ***Know Your Candidate*** या लिंकवर उपलब्ध असेल.

****

बंगळुरु कसोटीत भारतीय संघाचा पहिला डाव अवघ्या ४६ धावांत आटोपला. भारतीय संघाची ही मायदेशातली सर्वात कमी आणि एकूण तिसऱ्या क्रमांकाची किमान धावसंख्या आहे. विराट कोहलीसह भारताचे पाच खेळाडू शून्यावर बाद झाले. ऋषभ पंतनं २० आणि यशस्वी जयस्वालनं १३ धावा केल्या. मॅट हेन्रीनं १५ धावात ५ तर विल्यम ओरूक यानं १२ धावात ४ बळी घेतले. काल दुसऱ्या दिवसाचा खेळ थांबला तेव्हा न्यूझीलंडच्या ३ बाद १८० धावा झाल्या होत्या. न्यूझीलंडकडं आतापर्यंत १३४ धावांची आघाडी आहे.

****

राज्यस्तरीय शालेय व्हॉलीबॉल स्पर्धेत मुलांमधून छत्रपती संभाजीनगर संघाने तर मुलींमधून मुंबई संघाने विजेतेपद पटकावलं आहे. धाराशिव इथं छत्रपती शिवाजी विद्यालयाच्या मैदानावर झालेल्या या १९ वर्षे वयोगटातल्या स्पर्धेत यजमान लातूर

विभागाचे दोन्ही संघ उपविजेते राहिले. मुलांच्या अंतिम सामन्यात छत्रपती संभाजीनगर विभागाच्या संघाने लातूर विभाग संघावर ३ – ० तर मुलींच्या अंतिम सामन्यात मुंबई संघाने लातूर संघाला तीन विरुद्ध दोन असं पराभूत केलं.

****

तुळजापूर इथल्या श्री तुळजाभवानी मातेची मंचकी निद्रा काल अश्विनी पौर्णिमेला पूर्ण होऊन, देवी पुन्हा सिंहासनारूढ झाली. अश्विनी पौर्णिमेनिमित्त देवीच्या दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी झाली असून तुळजापूरकडे येणारे सर्व रस्ते भाविकांच्या गर्दीने फुलून गेले असल्याचं आमच्या वार्ताहारनं कळवलं आहे.

****

धाराशिव नगरपालिकेतल्या विविध घोटाळ्यांचा तपास करण्यासाठी विशेष तपास पथकाची स्थापना करण्यात आली आहे. शहरातल्या कचरा संकलन आणि प्रक्रिया प्रकल्पात हा घोटाळा झाल्याचा आरोप होता, भाजपाचे माजी आमदार सुरेश धस यांनी राज्य शासनाकडे आणि विधिमंडळात मागणी करून वारंवार पाठपुरावा केल्यानंतर विशेष तपास पथकाची स्थापना करण्यात आली आहे.

****